




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25






अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १४८। किंमत - २ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । १९/०६/२०२६ । पाने - ६


# फुटीर खा. वाकचौरेंविरोधात शिवसैनिकांचा संताप

## संगमनेरात प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन, ठाकरेंना दुसऱ्यांदा धोका

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी पुन्हा एकदा पक्षांतराचा मार्ग स्वीकारत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला सोडचिठ्ठी दिल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. वारंवार पक्ष बदलणे आणि नेतृत्वाशी एकनिष्ठ न राहणे हीच त्यांची राजकीय ओळख बनली असल्याचा आरोप शिवसैनिकांनी करत संगमनेर येथे त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करून निषेध नोंदविला.



शिवसैनिकांच्या मते, २००९ साली शिवसेनेने भाऊसाहेब वाकचौरे यांना खासदारकीची संधी दिली होती. मात्र २०१४ मध्ये त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून शिवसेना आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी गद्दारी केली. त्यानंतर काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश करत त्यांनी पुन्हा राजकीय भूमिका बदलली. या सततच्या पक्षांतरामुळे त्यांची विश्वासार्हता संपुष्टात आल्याने जनतेने त्यांना वारंवार नाकारल्याचे शिवसैनिकांचे म्हणणे आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ पूर्वी वाकचौरे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन पुन्हा शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या पुनर्प्रवेशाला विरोध केला होता. मात्र साईबाबांची शपथ घेऊन पक्षाशी एकनिष्ठ राहण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांना उमेदवारी देण्यात आली. शिवसैनिकांनी प्रचंड मेहनत घेत त्यांना विजयी केले. परंतु खासदार झाल्यानंतर पुन्हा एकदा त्यांनी पक्षाची साथ सोडत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाला पाठिंबा दिल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

शिवसैनिकांनी आरोप केला की, खासदार म्हणून निवडून आल्यानंतर वाकचौरे यांनी पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केले नाहीत. कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवला नाही तसेच मतदारसंघातील विकासकामांबाबतही अपेक्षित कामगिरी केली नाही. केवळ वैयक्तिक राजकीय फायद्यासाठी त्यांनी भूमिका बदलल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला.

संगमनेरात निषेध आंदोलन; प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अमर कतारी यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी सायंकाळी संगमनेर येथे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला साडी नेसवून निषेध व्यक्त करण्यात आला आणि त्यानंतर पुतळ्याचे दहन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत वाकचौरे यांच्या भूमिकेचा निषेध केला. पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, यापूर्वीही पक्षाशी गद्दारी केल्यानंतर वाकचौरे यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन माफी मागितली होती आणि आयुष्यभर शिवसेनेत राहण्याचे आश्वासन दिले होते. उद्धव ठाकरे यांनी मोठेपणा दाखवत त्यांना पुन्हा संधी दिली, मात्र खासदार झाल्यानंतर त्यांनी पुन्हा पक्षत्याग करून कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा दिला.

गद्दार नेत्यांना मतदारसंघात फिरू देणार नाही -

शिवसेना पदाधिकाऱ्यांनी इशारा देताना सांगितले की, शिर्डी लोकसभा मतदारसंघातील जनतेने विश्वासाने निवडून दिलेल्या प्रतिनिधीने वारंवार पक्षांतर करून मतदारांचा विश्वासघात केला आहे. अशा गद्दार नेत्यांना शिर्डी (पान ५)

## ठाकरेंचा व्हिप डावलला

## ६ खासदार शिंदे गटात




मुंबई (वृत्तसंस्था)

ठाकरेंच्या शिवसेनेकडून आज गुरुवार (१८ जून) रोजी संसदीय दलाची बैठक बोलावण्यात आली होती. ठाकरेंच्या शिवसेनेकडून सर्व खासदारांना व्हीप जारी करण्यात आला होता. या बैठकीकडे खासदारांच्या एकनिष्ठतेची लिटमस टेस्ट म्हणून बघितले जात होते. परंतु या बैठकीसाठी लोकसभेचे एकूण ९ पैकी ३ खासदार उपस्थित राहिले. ऑपरेशन टायगरमधील चर्चेत असणारे ६ खासदार गैरहजर राहिल्याने एकनाथ शिंदेंचं ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याचं शिक्कामोर्तब झालं आहे. त्यामुळे आता शिवसेना ठाकरे गटाकडून लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून अनुपस्थित राहिलेल्या ६ खासदारांवर कारवाई करण्याची मागणी केली जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, उद्धव ठाकरेंनी आपल्यासोबत असलेल्या ४ खासदारासोबत चर्चा केली. यावेळी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. (पान ५)

# भंडारदरा धरणाने गाठला तळ, पिण्यासाठी पाणी राखीव



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जून अर्धा सरला तरी पावसाने अजून हजेरी लावली नाही त्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याची भविष्यात मोठी टंचाई निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर सरकारने भंडारदरा धरणासह सर्व धरणातील पाणी पिण्यासाठी राखून ठेवले आहे. उत्तर अहिल्या नगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या भंडारदरा व निळवंडे धरणाने तळ गाठला असून माणसांसह या धरणांना देखील पावसाची ओढ लागली आहे.

राज्यात सद्यस्थितीत पाणी संचय करण्यात येणाऱ्या लहान, मध्यम व मोठे एकूण एकत्रित सुमारे ३०२८ इतकी धरणे असून यावर्षीच्या १६ जुन २०२६ रोजी या सर्व धरणांमध्ये सुमारे २४.४१%टक्के ( ३५२.०९३ टी.एम.सी.) इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

अल-निनोचा प्रभाव व वाढते उष्णतामान यामुळे यंदाचा पाणीसाठा कमी झाल्यामुळे चिंतेची बाब वाटते. सद्यस्थितीत १६ जुन रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख धरणांमध्ये असलेला एकुण पाणी साठा पुढीलप्रमाणे भंडारदरा धरण सुमारें २३६३ दलघफु ( २१.४१%), निळवंडे धरण - १८६९ दलघफु (२२.४६%), मुळा धरण--६६५० दलघफु (२५.५८), आढळा धरण - ३७३ दलघफु (३५.१९%), इतका पाणीसाठा शिल्लक आहे. हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार येत्या पावसाळ्यात पावसाचे प्रमाण सरासरी आकडेवारीपेक्षा कमी राहणार असल्याने आणि लांबणीवर पडलेली पावसाची सुरुवात लक्षात घेऊन दि.३१ ऑगस्ट २०२६ अखेरपर्यंत पिण्याचे पाणी पुरविणे यालाच प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. बरोबर दहा वर्षांपूर्वी म्हणजेच सन २०१५-१६ सालामध्ये देखील पावसाने अशीच दडी मारली होती आणि पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारिणीवर संगमनेरचा झेंडा

## गोरख कुटे व श्रीनिवास भंडारी यांची बिनविरोध निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- राज्यातील व्यापारी, उद्योजक आणि उद्योग क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर या प्रतिष्ठित संस्थेच्या द्विवार्षिक निवडणुकीत संगमनेरच्या दोन मान्यवर व्यावसायिकांची महत्त्वपूर्ण निवड झाली आहे. प्रसिद्ध उद्योजक, माजी नगरसेवक गोरख वसंतराव कुटे तसेच ज्येष्ठ व्यापारी श्रीनिवास फुलचंद भंडारी यांची गव्हर्निंग कौन्सिल (कार्यकारिणी सदस्य) पदावर बिनविरोध निवड झाल्याने संगमनेरसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



गोरख वसंतराव कुटे — श्रीनिवास फुलचंद भंडारी

मुंबई येथे आयोजित विशेष कार्यक्रमात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नवनिर्वाचित अध्यक्ष रवींद्र माणगावकर यांच्या हस्ते गोरख कुटे आणि श्रीनिवास भंडारी यांना निवडीचे अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

गोरख कुटे आणि श्रीनिवास भंडारी यांनी उद्योग, व्यापार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून व्यापारी संघटनांमध्ये त्यांचा प्रभावी सहभाग राहिला आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि नेतृत्वगुणांचा लाभ आता राज्यातील व्यापारी व उद्योजकांना मिळणार आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या निर्णय प्रक्रियेत गव्हर्निंग कौन्सिलला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या कौन्सिलवर संगमनेरच्या दोन्ही प्रतिनिधींची निवड झाल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रातील व्यापारी, उद्योजक आणि लघुउद्योग क्षेत्रातील विविध प्रश्न राज्यस्तरावर प्रभावीपणे मांडण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

या निवडीमुळे संगमनेरच्या व्यापारी क्षेत्राची राज्यस्तरावरील ओळख अधिक भक्कम झाली असून जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, विविध व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी गोरख कुटे व श्रीनिवास भंडारी यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.














# सोशल मीडियाचा तरुण पिढीवर परिणाम

## संधी, आव्हाने आणि जबाबदारी

**एकविसाव्या शतकातील डिजिटल क्रांतीमुळे सोशल मीडिया हे तरुणांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सप आणि एक्स यांसारख्या विविध माध्यमांमुळे संवाद, माहितीची देवाणघेवाण आणि मनोरंजनाची व्याप्ती प्रचंड वाढली आहे. आजचा तरुण दिवसातील मोठा वेळ सोशल मीडियावर घालवत असून त्याचा परिणाम त्यांच्या विचारसरणी, शिक्षण, करिअर, सामाजिक संबंध आणि मानसिक आरोग्यावर होताना दिसून येतो. सोशल मीडिया हे एक प्रभावी साधन असले तरी त्याचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत. त्यामुळे सोशल मीडियाचा तरुण पिढीवर नेमका काय परिणाम होत आहे, याचा सखोल विचार करणे आज काळाची गरज बनली आहे.**



**आजच्या काळात तरुणांच्या हातातील स्मार्टफोन हे केवळ संवादाचे साधन राहिलेले नाही, तर ते त्यांच्या दैनंदिन जीवनाचा केंद्रबिंदू बनले आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत सोशल मीडियाचा वापर हा अनेक तरुणांच्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग झाला आहे. ज्ञान, मनोरंजन, करिअरच्या संधी आणि सामाजिक संपर्क यांसाठी उपयुक्त ठरणारे हे माध्यम एका बाजूला नव्या शक्यता निर्माण करत असताना दुसऱ्या बाजूला मानसिक ताण, आभासी जगाचे आकर्षण आणि सामाजिक दुरावा यांसारखी आव्हानेही निर्माण करत आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा तरुण पिढीवर होणारा प्रभाव समजून घेणे आणि त्याचा संतुलित वापर करणे ही काळाची महत्त्वाची गरज बनली आहे.**

एकविसावे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या क्रांतीमुळे जग अक्षरशः एका क्लिकवर आले आहे. या डिजिटल क्रांतीमध्ये सोशल मीडिया हे सर्वात प्रभावी माध्यम बनले आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर), यूट्यूब, व्हॉट्सप, टेलिग्राम, स्नॅपचॅट यांसारख्या प्लॅटफॉर्मनी संवाद, माहितीची देवाणघेवाण, मनोरंजन आणि ज्ञानप्राप्तीची संकल्पनाच बदलून टाकली आहे. विशेषतः तरुण पिढीच्या जीवनावर सोशल मीडियाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. आजचा तरुण दिवसाची सुरुवात आणि शेवट अनेकदा सोशल मीडियासोबतच करतो. त्यामुळे सोशल मीडियाचा तरुणांच्या विचारांवर, वर्तनावर, शिक्षणावर, मानसिक आरोग्यावर, सामाजिक संबंधांवर आणि करिअरवर सकारात्मक तसेच नकारात्मक परिणाम होत आहेत. भारत हा जगातील सर्वात मोठ्या युवा लोकसंख्येचा देश मानला जातो. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी मोठा हिस्सा हा तरुणांचा आहे. ही युवा शक्ती देशाच्या विकासाचा कणा मानली जाते. अशा परिस्थितीत तरुण पिढी कोणत्या दिशेने जात आहे आणि त्यावर सोशल मीडियाचा कसा प्रभाव पडतो आहे, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सोशल मीडिया हे एक साधन आहे. त्याचा उपयोग कसा केला जातो यावर त्याचे परिणाम अवलंबून असतात. योग्य वापर केल्यास ते प्रगतीचे साधन ठरू शकते, तर चुकीच्या वापरामुळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. सोशल मीडिया म्हणजे इंटरनेटवर आधारित असे माध्यम, ज्याद्वारे लोक माहिती, विचार, छायाचित्रे, व्हिडिओ, ऑडिओ आणि विविध प्रकारची सामग्री इतरांपर्यंत पोहोचवू शकतात. यामुळे संवाद अधिक जलद, सुलभ आणि व्यापक झाला आहे. काही सेकंदांत जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी संपर्क साधणे शक्य झाले आहे. त्यामुळे भौगोलिक अंतराची मर्यादा जवळपास संपुष्टात आली आहे. आज शिक्षण, व्यवसाय, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि मनोरंजन या सर्व क्षेत्रांमध्ये सोशल मीडियाची भूमिका महत्त्वपूर्ण बनली आहे. तरुणांसाठी सोशल मीडियाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे माहितीचा सहज आणि जलद प्रवेश. पूर्वी एखादी माहिती मिळवण्यासाठी ग्रंथालये, वर्तमानपत्रे किंवा विविध संदर्भग्रंथांचा आधार घ्यावा लागत असे. आज मात्र काही क्षणांत जगभरातील माहिती उपलब्ध होते. विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन वर्ग, शैक्षणिक व्हिडिओ, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, करिअरविषयक माहिती आणि विविध कौशल्ये शिकण्याच्या संधी सोशल मीडियामुळे उपलब्ध झाल्या आहेत. यूट्यूबसारख्या प्लॅटफॉर्ममुळे अनेक विद्यार्थ्यांनी कमी खर्चात दर्जेदार शिक्षण मिळवले आहे.

संवादाच्या क्षेत्रातही सोशल मीडियाने क्रांती घडवून आणली आहे. कुटुंबातील सदस्य, मित्र आणि नातेवाईक यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवणे सोपे झाले आहे. परदेशात राहणाऱ्या व्यक्तींसोबतही व्हिडिओ कॉलद्वारे प्रत्यक्ष संवाद साधणे शक्य झाले आहे. त्यामुळे सामाजिक संबंध टिकवून ठेवण्यास मदत झाली आहे. अनेक तरुणांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून नवीन मित्र जोडले, विविध संस्कृती समजून घेतल्या आणि जागतिक स्तरावरील घडामोडींशी परिचय करून घेतला. करिअर आणि व्यवसायाच्या दृष्टीने सोशल मीडिया हे प्रभावी साधन बनले आहे. अनेक तरुणांनी यूट्यूबर, इन्फ्लुएन्सर, कंटेंट क्रिएटर, डिजिटल मार्केटर, ग्राफिक डिझायनर, ब्लॉग लेखक आणि ऑनलाइन उद्योजक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. सोशल मीडियामुळे लहान उद्योगांना जागतिक बाजारपेठ मिळाली आहे. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. अनेक तरुण आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन करून आर्थिक स्वावलंबन प्राप्त करत आहेत.

सामाजिक जागरूकता निर्माण करण्यामध्ये सोशल मीडियाची भूमिका महत्त्वाची आहे. पर्यावरण संरक्षण, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, रक्तदान, स्वच्छता आणि विविध सामाजिक चळवळींबाबत जनजागृती करण्यासाठी सोशल मीडिया प्रभावी ठरतो. अनेक तरुण सामाजिक विषयांवर आपली मते व्यक्त करतात आणि समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतात. आपत्तीच्या काळात मदतकार्य, निधी संकलन आणि माहिती प्रसारित करण्यासाठीही सोशल मीडिया उपयुक्त ठरला आहे.

मात्र सोशल मीडियाचे अनेक दुष्परिणामही समोर येत आहेत. त्यातील सर्वात गंभीर परिणाम मानसिक आरोग्यावर होत असल्याचे दिसून येते. अनेक तरुण सोशल मीडियावर इतरांचे यश, ऐश्वर्य आणि जीवनशैली पाहून स्वतःची तुलना करू लागतात. या तुलनेमुळे न्यूनगंड, असुरक्षितता, ताण आणि नैराश्य वाढण्याची शक्यता असते. सतत लाईक्स, कमेंट्स आणि फॉलोअर्सची अपेक्षा निर्माण झाल्याने मानसिक दबाव वाढतो. अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास निराशा निर्माण होऊ शकते. सोशल मीडियाचे व्यसन ही आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक तरुण दिवसातील अनेक तास मोबाईल स्क्रीनसमोर घालवतात. सतत नोटिफिकेशन्स तपासणे, रील्स पाहणे किंवा चॅटिंग करणे ही सवय बनते. त्यामुळे अभ्यास, खेळ, वाचन आणि इतर सर्जनशील उपक्रमांकडे दुर्लक्ष होते. वेळेचे व्यवस्थापन बिघडते आणि उत्पादकता कमी होते. झोपेच्या वेळेतही सोशल मीडियाचा वापर केल्याने आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

फेक न्यूज आणि दिशाभूल करणारी माहिती हे सोशल मीडियासमोरील मोठे आव्हान आहे. अनेक वेळा अप्रमाणित माहिती वेगाने पसरते आणि लोकांमध्ये गोंधळ निर्माण करते. तरुण अनेकदा अशा माहितीची सत्यता पडताळून न पाहता ती पुढे पाठवतात. यामुळे सामाजिक तणाव, अफवा आणि गैरसमज वाढू शकतात. डिजिटल साक्षरतेचा अभाव असल्यास तरुण सहजपणे चुकीच्या माहितीच्या प्रभावाखाली येऊ शकतात. सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण ही देखील चिंतेची बाब आहे. ऑनलाइन फसवणूक, हॅकिंग, बनावट प्रोफाइल, ओटीपी फसवणूक, सायबर बुलिंग आणि डेटा चोरी यांसारख्या घटना वाढत आहेत. अनेक तरुण वैयक्तिक माहिती निष्काळजीपणे शेअर करतात. त्यामुळे त्यांची गोपनीयता धोक्यात येते. सोशल मीडियावर होणारा छळ, अपमानास्पद टिप्पण्या आणि धमक्या यामुळे अनेक युवक-युवती मानसिक त्रासाला सामोरे जातात.

सामाजिक नातेसंबंधांवरही सोशल मीडियाचा परिणाम होत आहे. डिजिटल माध्यमांवर संवाद वाढला असला तरी प्रत्यक्ष भेटीगाठी आणि मानवी संवाद कमी होत असल्याचे दिसते. एकाच घरात राहणारे सदस्यही अनेकदा मोबाईलमध्ये व्यस्त असतात. यामुळे कुटुंबीयांमधील भावनिक जवळीक कमी होण्याची शक्यता असते. आभासी जगातील संबंध वाढत असताना वास्तविक नातेसंबंध दुर्लक्षित होत आहेत. तरुणांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरही सोशल मीडियाचा प्रभाव पडतो. काही वेळा लोकप्रियता मिळवण्यासाठी धोकादायक स्टंट, अयोग्य वर्तन किंवा चुकीचे ट्रेंड्स अनुसरण्याची प्रवृत्ती दिसून येते. व्हायरल होण्याच्या स्पर्धेमध्ये नैतिक मूल्यांकडे दुर्लक्ष केले जाते. प्रसिद्धीची लालसा आणि तत्काळ यशाची अपेक्षा यामुळे संयम आणि परिश्रम यांसारख्या गुणांवर परिणाम होऊ शकतो. शैक्षणिक क्षेत्रात सोशल मीडिया उपयुक्त असला तरी त्याचा अतिरेक विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम करतो. ऑनलाइन शिक्षणासाठी वापरला जाणारा मोबाईल अनेकदा मनोरंजनाचे साधन बनतो. अभ्यासाच्या वेळेत सोशल मीडिया वापरल्यामुळे एकाग्रता कमी होते.

परीक्षांमध्ये अपेक्षित यश न मिळाल्यास त्याचा परिणाम आत्मविश्वासावर होतो. सोशल मीडियामुळे तरुणांच्या जीवनशैलीतही बदल झाले आहेत. शारीरिक हालचाली कमी झाल्याने लठ्ठपणा, डोळ्यांचे विकार, मानदुखी आणि झोपेच्या समस्या वाढत आहेत. सतत स्क्रीनसमोर राहिल्याने मानसिक थकवा आणि तणाव निर्माण होतो. आरोग्यदायी जीवनशैलीसाठी आवश्यक असलेले खेळ, व्यायाम आणि मैदानी उपक्रम यांना कमी वेळ दिला जातो.

या सर्व परिस्थितीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पालकांनी मुलांशी संवाद साधून सोशल मीडियाच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. मुलांवर नियंत्रण ठेवण्यापेक्षा त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे. शाळा आणि महाविद्यालयांनी डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना जबाबदार इंटरनेट वापराची माहिती द्यावी.

सरकार, शैक्षणिक संस्था आणि सोशल मीडिया कंपन्यांनीही आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, फेक न्यूजवर नियंत्रण ठेवणे आणि ऑनलाइन छळाविरोधात कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मनी वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे संरक्षण करण्यासाठी अधिक प्रभावी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

तरुणांनी स्वतःही सोशल मीडियाचा वापर करताना काही गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. वापरासाठी निश्चित वेळ ठरवणे, माहितीची सत्यता पडताळणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे, सकारात्मक आणि शैक्षणिक सामग्रीला प्राधान्य देणे आणि प्रत्यक्ष जीवनातील नातेसंबंध जपणे या सवयी विकसित करणे गरजेचे आहे. सोशल मीडिया हे जीवनाचा भाग असावे, संपूर्ण जीवन नव्हे, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियापासून पूर्णपणे दूर राहणे शक्य नाही आणि आवश्यकही नाही. कारण त्यामध्ये अमर्याद संधी दडलेल्या आहेत. मात्र त्याचा वापर विवेकाने आणि जबाबदारीने करणे अत्यंत आवश्यक आहे. सोशल मीडिया हे ज्ञान, प्रगती आणि संवादाचे प्रभावी साधन ठरू शकते; परंतु त्याचा अतिरेक व्यक्तीला मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक समस्यांकडे नेऊ शकतो.

निष्कर्षतः, सोशल मीडियाचा तरुण पिढीवर होणारा परिणाम हा पूर्णपणे चांगला किंवा पूर्णपणे वाईट असा नाही. तो वापराच्या पद्धतीवर अवलंबून आहे. योग्य मार्गदर्शन, डिजिटल साक्षरता, आत्मनियंत्रण आणि जबाबदार वापर यांच्या साहाय्याने सोशल मीडिया तरुणांच्या प्रगतीचे शक्तिशाली माध्यम बनू शकते. भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवा शक्तीने सोशल मीडियाचा वापर ज्ञान, कौशल्य, नवकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने करणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाचे स्वामी बनणे महत्त्वाचे आहे, त्याचे गुलाम नव्हे. सोशल मीडियाचे सुजाण आणि संतुलित व्यवस्थापन हेच सक्षम, सशक्त आणि यशस्वी तरुण पिढीचे खरे वैशिष्ट्य ठरेल

•

# ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे महत्त्व आणि पालकांची जबाबदारी




आजच्या आधुनिक युगात शिक्षण हे प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क मानले जाते. परंतु दुर्दैवाने ग्रामीण भागातील अनेक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विद्यार्थीसंख्या कमी झाल्यामुळे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. या शाळा केवळ शिक्षण देणाऱ्या संस्था नसून गावाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाचे केंद्र आहेत. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत प्रवेश देणे ही काळाची गरज बनली आहे.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शासनाकडून मोफत शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, मध्यान्ह भोजन, शिष्यवृत्ती तसेच विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. आज अनेक जिल्हा परिषद शाळा डिजिटल बनल्या असून स्मार्ट टीव्ही, संगणक, ई-लर्निंग आणि आधुनिक अध्यापन पद्धतींचा वापर केला जात आहे. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा लक्षणीयरीत्या उंचावला आहे.

अनेक पालक आपल्या मुलांना खासगी शाळांमध्ये प्रवेश देण्यास प्राधान्य देतात. खासगी शाळांमध्ये इंग्रजी माध्यम असल्यामुळे तेथील शिक्षण अधिक चांगले असेल असा अनेकांचा समज आहे. परंतु केवळ इंग्रजी माध्यम म्हणजे चांगले शिक्षण असे नाही. जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक उच्चशिक्षित, प्रशिक्षित आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असतात. कमी विद्यार्थीसंख्या असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया अधिक मजबूत होतो.

आई ही मुलाची पहिली गुरू असते आणि मातृभाषेतून मिळालेले शिक्षण मुलांच्या बौद्धिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. जिल्हा परिषद शाळांमध्ये मातृभाषेत शिक्षण दिले जात असल्यामुळे मुलांना विषय सहज समजतो. त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि शिक्षणाविषयीची आवडही निर्माण होते. याशिवाय मुलांमध्ये संस्कार, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक मूल्ये रुजविण्याचे कार्यही या शाळांमधून प्रभावीपणे केले जाते. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा टिकल्या तरच गावाचा शैक्षणिक विकास होईल. शाळा बंद पडल्यास विद्यार्थ्यांना दूरच्या ठिकाणी शिक्षणासाठी जावे लागेल. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अतिरिक्त भार पालकांवर पडेल. अनेक गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबांतील मुलांचे शिक्षणही अर्धवट राहण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. म्हणूनच आपल्या गावातील शाळा जपणे आणि त्यांचे अस्तित्व टिकवणे ही प्रत्येक गावकऱ्याची सामूहिक जबाबदारी आहे. आज जिल्हा परिषद शाळांमधून शिकलेले अनेक विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, शास्त्रज्ञ आणि विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यक्ती म्हणून देशाची सेवा करत आहेत.

त्यामुळे जिल्हा परिषद शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकत नाहीत हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. योग्य मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांची मेहनत यामुळे या शाळांमधील विद्यार्थीही मोठी स्वप्ने पूर्ण करू शकतात. पालकांनी केवळ दिखाऊपणा किंवा समाजातील स्पर्धा यांचा विचार न करता आपल्या मुलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करावा. गावातील जिल्हा परिषद शाळेत प्रवेश देऊन आपल्या मुलांचे भविष्य घडविण्यास हातभार लावावा. कारण मजबूत शाळा म्हणजे मजबूत समाज आणि सुशिक्षित समाज म्हणजे प्रगत राष्ट्र. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, आपल्या गावची शाळा हीच आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यातील पहिली पायरी आहे. चला, जिल्हा परिषद शाळांना बळ देऊया, आपल्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊया आणि शिक्षित, सुसंस्कृत व प्रगत समाज घडविण्यास हातभार लावूया.

# दामोधर मालपाणी यांचा स्मृतीदिन

## १३६ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मालपाणी उद्योग समूहाचे संस्थापक स्वर्गीय दामोधर मालपाणी यांच्या ५१ व्या स्मृतीदिनानिमित्त मालपाणी उद्योग समूहाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकीची जपवणूक करत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला कर्मचारी, अधिकारी व रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन उद्योग समूहाचे संचालक हर्ष मालपाणी आणि अर्पण रक्तपेढीच्या डॉ.मधुरा पाठक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हर्ष मालपाणी यांनीही रक्तदान करुन इतरांना प्रेरणा दिली. रक्तदात्यांशी बोलताना त्यांनी स्वर्गीय दामोधर मालपाणी यांचा सहवास, त्यांच्या कार्याची आणि विचारांची ओळख, त्यांची शिवभक्ती आदींबाबत माहिती दिली. गायींच्या प्रति त्यांची श्रद्धा सांगताना ते नियमित त्यांना चारा भरवल्याशिवाय अन्नाचा कणही घेत नसत, त्यांच्या निधना वेळी गोठ्यातील गायींनीही चारा खाल्ला नव्हता, ही त्यांच्या श्रद्धेची आणि प्रेमाची प्रचिती असल्याचे व त्यांचे विचार आणि संस्कारच आमच्या कार्याचा पाया असल्याचे त्यांनी सांगितले.

देवदत्त सोमवंशी यांनी प्रास्तविक केले. उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक रमेश घोलप, अर्पण रक्तपेढीच्या डॉ.मधुरा पाठक यांनी रक्तदानाचे महत्त्व आणि त्यातून होणाऱ्या समाजोपयोगी कार्याविषयी माहिती दिली. यावेळी श्रीमती ललितादेवी, अंजली तापडिया, कामगार नेते कॉ.माधवराव नेहे आदींची उपस्थिती होती.

मुरारी देशपांडे यांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून देणारी प्रभावी कविता सादर केली. त्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी उद्योग समूहातील १३६ कामगार, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदनाचे पवित्र कार्य केले. संतोष राऊत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. रविंद्र कानडे व मंगेश उणवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस


दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# संगमनेरमध्ये येणाऱ्या वाईन्स शॉप स्थानिक व्यापारी व नागरिकांचा विरोध

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर येथील एका वाईन्स शॉपच्या संगमनेर येथील प्रस्तावित स्थलांतरास स्थानिक व्यापारी, गाळाधारक व नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री सुनेत्रा पवार, जिल्हाधिकारी व राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक यांना निवेदन देऊन संबंधित वाईन शॉपला परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

सदर निवेदनानुसार, अहिल्यानगर येथील संबंधित वाईन्स शॉपचे संगमनेर शहरातील नाशिक-पुणे महामार्गावरील 'टॉप टेन इम्पेरियल जागेत स्थलांतर करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावाला स्थानिक व्यापारी व गाळाधारकांनी विविध कारणांवरून हरकत घेतली आहे. प्रस्तावित जागा ही व्यावसायिक संकुलामध्ये असून तेथे विविध प्रकारचे व्यवसाय सुरू आहेत. या परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात ग्राहकांची वर्दळ असते. विशेषतः महिला व लहान मुलांची उपस्थिती लक्षणीय असल्याने परिसर 'वूमन सेंट्रिक वर्किंग उमॉस्फिअर' म्हणून ओळखला जोतो. अशा ठिकाणी वाईन शॉप सुरू झाल्यास महिलांच्या

सुरक्षिततेवर परिणाम होऊन असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात् आली आहे. याशिवाय परिसरातील इतर व्यावसायिकांना दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असून त्यामुळे संबंधित व्यावसायिक संकुलातील व्यापाऱ्यांनी परस्पर सहमतीने संकुलात कोणत्याही प्रकारचा मद्यविक्री व्यवसाय सुरू न करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच अशा स्थलांतरासाठी इमारतीच्या सहकारी संस्थेची ना हरकत आवश्यक असून शासन नियमांनुसार ती बंधनकारक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जर हि परवानगी मिळाली तर येथील व्यवसायावरही विपरीत परिणाम होऊ शकतो, असे निवेदनात म्हटले आहे. वाईन शॉपमुळे गर्दी वाढून वाहतूक कोंडी व पार्किंगची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. परिणामी अपघातांचा धोका वाढू शकतो, दरम्यान, या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून संबंधित वाईन शॉपच्या स्थलांतरास परवानगी देऊ नये, अन्यथा व्यापक स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर टॉप टेन गाळाधारकांच्या सह्या आहेत.

# बसस्थानक परिसरातील अवैध वाहतुकीवर लगाम

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यभरातील बसस्थानकांच्या २०० मीटर परिघातील अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेचा सकारात्मक परिणाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) उत्पन्नावर दिसून आला आहे. अवघ्या १५ दिवसांत एसटीच्या उत्पन्नात ४३ कोटी ८३ लाख रुपयांची वाढ झाली असून दररोजच्या सरासरी उत्पन्नात सुमारे ३ कोटी रुपयांची भर पडली आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या सूचनेनुसार आणि न्यायालयाच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी प्रियांका नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली परिवहन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस प्रशासन आणि एसटी यंत्रणेने संयुक्त कारवाई केली. एसटी प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, १ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत महामंडळाचे एकूण वाहतूक उत्पन्न ४९५ कोटी ३४ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले. मागील वर्षीच्या याच कालावधीत हे उत्पन्न ४ कोटी ५१ लाख रुपये होते. यामुळे ४३ कोटी ८३ लाख रुपयांची म्हणजेच ९.७१ टक्के वाढ झाली आहे. उत्पन्नवाढीमध्ये रायगड, पुणे, सातारा, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नांदेड या विभागांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुस्पष्टपणे दिसून येत आहे.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS
1) FAKIRMOHAMMAD IMAM SHAIKH
2) SHE FAKİR MOHAMMAD JANU
TO NEW NAME AS
FAKIR MOHAMMAD IMAM SHAIKH
UIDAI 504322503456
ADRESS - AT POST- KURAN
SANGAMNER 422605


# विकास कामांमध्ये गैरव्यवहार जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशीचे आदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - नगरपंचायतीमध्ये झालेल्या विकासकामांमध्ये गैरव्यवहार, अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याच्या गंभीर आरोपांप्रकरणी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संगमनेर येथील उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांना चौकशीचे आदेश दिले. या प्रकरणी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे व उपनगराध्यक्ष शरद नवले यांच्यावर पदावरून काढून टाकण्याची टांगती तलवार आहे. अकोले नगरपंचायतीतील भ्रष्टाचार प्रकरणाचे चौकशीत दोष सिद्ध झाल्यास नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षांच्या खुर्चीला धोका निर्माण होऊन पदमुक्त करण्याची कारवाई होऊ शकते. जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेशाची प्रत नगराध्यक्ष, मुख्याधिकारी व नगरपंचायत सदस्यांना पाठवण्यात झालेल्या आली आहे. माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेविका सोनाली

नाईकवाडी व इतर १२ नगरसेवकांनी २० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणीपत्र सादर केले. या पत्रातून विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असून संबंधित पदाधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी व नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षांना तात्काळ पदमुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी तक्रारीची दखल घेऊन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ५५ अन्वये चौकशीचे आदेश १५ जून रोजी जारी केले. चौकशीसाठी १५ दिवसांची मुदत दिली आहे.

# साकूरला स्वतंत्र पोलिस उपनिरीक्षक मिळण्याचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवणार



**पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे**

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - घारगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सर्वात मोठे गाव असलेल्या साकूरसाठी स्वतंत्र पोलीस उपनिरीक्षक व दोन-तीन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती घारगाव पोलीस स्टेशनचे नूतन पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी दिली.

नुकत्याच साकूर भेटीदरम्यान ग्रामसचिवालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकरराव खेमनर, ज्येष्ठ नेते बाळासाहेब खेमनर, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रऊफ शेख, थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत खेमनर, भाजप तालुकाध्यक्ष गुलाबराजे भोसले यांच्यासह ग्रामस्थ व पत्रकार उपस्थित होते.

बोरसे म्हणाले की, साकूरपासून घारगाव पोलीस स्टेशनचे अंतर अधिक असल्याने येथे स्वतंत्र पोलीस अधिकारी असणे आवश्यक आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रात्रीची गस्त वाढविणे, अवैध धंदे व वाळू तस्करीवर कारवाई करणे तसेच वाहतूक शिस्तीवर भर देण्यात येणार आहे. धार्मिक स्थळांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

शंकरराव खेमनर यांनी साकूर ही मोठी बाजारपेठ असून सर्व धर्मीय लोक येथे सलोख्याने राहत असल्याचे सांगितले. तर रऊफ शेख यांनी साकूरसाठी स्वतंत्र पोलीस उपनिरीक्षकाची मागणी करत वाहतूक कोंडी, अवैध धंदे व सोशल मीडियावरील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली.

इंद्रजीत खेमनर यांनी साकूर हे सुमारे ३० गावांचे मध्यवर्ती ठिकाण असून गावात सामाजिक सलोखा व शांतता कायम असल्याचे सांगत पोलीस निरीक्षक बोरसे यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# बनावट दूध रॅकेट प्रकरण ; जामखेडमध्ये ७ जणांना अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे बनावट दूध निर्मितीचे रॅकेट उघडकीस आले. आतापर्यंत ७ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी एलसीबीचा पदभार स्वीकारल्यानंतर गुन्ह्याच्या तपासाला गती आली असून, एक रात्रीत सात संशयितांना पोलिसांनी अटक केली. आता अटक आरोपींची संख्या १४ झाली आहे.हरिदास एकनाथ गोपाळघरे (वय ३४, रा. नागोबाचीवाडी, ता. जामखेड), सद्दाम कमरूद्दीन शेख (वय २९), चंद्रकांत आण्णा बर्डे (वय ३६, दोघे रा. उंबरे, ता. राहुरी), महेश तुकाराम मोकाटे (वय २५, रा. इमामपूर, ता. अहिल्यानगर), लक्ष्मण पोपट करंजुले (वय ३१, रा. पाडळी रांजणगाव, ता. पारनेर), किशोर काशिनाथ पुंड (वय ४६, रा. भोकर, ता. श्रीरामपूर), सर्जेराव काशिनाथ म्हसे (वय ४५, रा. शिलेगाव, ता. राहुरी), अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.एलसीबी आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्त कारवाई करीत १४ फेब्रुवारी रोजी छापा घालून बनावट दुधाचे रॅकेट उघडकीस आणले. एलसीबीचे तत्कालीन पोलिस निरीक्षक किरण कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक समीर अभंग यांनी गुन्ह्याचा तपास करून ४१ संशयित निष्पन्न केले. गेल्या चार महिन्यात त्यात केवळ सात जणांना अटक करण्यात आली.

दरम्यान, पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी एलसीबीचा पदभार स्वीकारल्यानंतर गुन्ह्याच्या तपासाला गती मिळाली. एलसीबीच्या पथकाने एक रात्रीत वरील सात संशयितांना अटक केली. आता अटक आरोपींच्या संख्या १४ झाली आहे. तपासात संशयितांनी बनावट दूध निर्मितीसाठी आवश्यक रसायने, पावडर आणि अन्य साहित्याचा पुरवठा केल्याचे निष्पन्न झाले आहे. काही संशयितांनी घातक रसायनांपासून कृत्रिम दूध तयार करून त्याची विक्री केल्याचे, तर काहींनी त्याचे संकलन व वितरण केल्याचेही समोर आले आहे..

दरम्यान, गुन्ह्याचा तपासात सात जणांविरोधात सुमारे ८५० पानी दोषारोपपत्र जामखेड न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. अटक करण्यात आलेल्यांपैकी चौघांना जामीन मिळाला असून तिघे आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. नव्या कारवाईनंतर या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या १४ वर पोहोचली आहे. अद्याप २७ संशयित पसार असून त्यांना अटकपूर्व जामीन मिळालेला नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे येत्या काळात आणखी अटकसत्र सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या गुन्ह्यात आणखी आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता असून, बनावट दुधाचा ओघळ नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, पुणे जिल्ह्यात जाण्याची शक्यता आहे.

# प्रवेशोत्सवाने दुमदुमले आश्वी इंग्लिश स्कूल



युवावार्ता (प्रतिनिधी) आश्वी -

शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य, शिस्त, संस्कार आणि आत्मविश्वास यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. आमच्या विद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड, क्रीडा, सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या आश्वी इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य दिपक चव्हाण यांनी प्रवेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

रयत शिक्षण संस्थेच्या आश्वी इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, आश्वी बुद्रुक (ता. संगमनेर) येथे प्रवेशोत्सवानिमित्त इयत्ता पाचवी ते दहावीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम विद्यार्थ्यांची ढोल-ताशांच्या गजरात प्रभात फेरी काढण्यात आली. विद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ महिला शिक्षकांनी औक्षण करून नवागत विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील तसेच रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य सुमतीलाल गांधी, गणेश गायकवाड, सुरेश होडगर, सरपंच नामदेव शिंदे, सेवानिवृत्त प्राचार्य राजू शहाणे, विद्यालयाचे पर्यवेक्षक रमेश थेटे, सुवर्णा वाकचौरे, अनिता गाडे, मोहन घिगे, राजेंद्र बर्डे, उषा घिगे, वैशाली सोसे, हरिभाऊ कोकाटे, सोनाली वैद्य, सुनंदा काळे, पवण माळी, सिमा जगदाळे तसेच शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य संगीता धराडे व घोडके यांच्या हस्ते इयत्ता पाचवी ते दहावीतील नवागत विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, पेन व पुस्तक संचाचे वितरण करण्यात आले.

पुढे बोलताना प्राचार्य दिपक चव्हाण म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असलेली सुप्त क्षमता ओळखून त्याला योग्य दिशा देणे हेच आमचे ध्येय आहे. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील सुसंवादातूनच यशस्वी भविष्य घडते. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत, मेहनतीच्या जोरावर ती पूर्ण करावीत आणि समाजासाठी आदर्श नागरिक बनावे. मागील वर्षी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत २०० पेक्षा अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या ज्ञानेश्वरी भुसाळ, हुमेमा तांबोळी, स्वतंत्रता दराडे, दिया बर्डे आणि वेदश्री बिडवे या पाच विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट गुण मिळवत विद्यालयाच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली.

नवागत विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉइंटवर छायाचित्रणाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. तसेच शाळेतील त्यांचे पहिले पाऊल कायम स्मरणात राहावे यासाठी कुंकवाचे ठसे घेण्याचा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता गाडे व सुवर्णा वाकचौरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बागुल यांनी मानले.प्रवेशोत्सवामुळे संपूर्ण विद्यालय परिसर आनंद, उत्साह आणि नव्या स्वप्नांच्या उंच भरारीने भारावून गेला.

# बांधकाम कामगारांनी आमिषाला बळी न पडता नि:शुल्क लाभ घ्यावा - आ. खताळ



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - बांधकाम कामगार, घरगुती कामगार, सुतार, इलेक्ट्रिशियन, रंगकाम करणारे कामगार तसेच बांधकाम क्षेत्राशी संबंधित सर्व घटक हे राज्य आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहेत. त्यांच्या कष्टांमुळेच विकासाची गती टिकून आहे. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ खऱ्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

संगमनेर येथे आयोजित बांधकाम कामगार लाभवाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते भीमराज चत्तर, तालुकाप्रमुख गुलाब भोसले, शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी आरपीआय शहर आध्यक्ष कैलास कासार युवासेना उपजिल्हा प्रमुख सौरभ देशमुख तालुकाप्रमुख सुशील शेवाळे शहर प्रमुख सार्थक शेवाळे नगरसेविका साक्षी सूर्यवंशी महिला उपजिल्हा प्रमुख दिपाली वाव्हळ संगीता पुंड सपना जाधव, बांधकाम विभागाचे अधिकारी स्वप्नील जाधव ललित दाभाडे निखिल सौंदारे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, केंद्रा तील पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वा खालील महायुती सरकार सामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून काम करत आहे.शासनाच्या योजना केवळ काही मोजक्या लोकांपुरत्या मर्यादित न राहता सामान्य शेतकरी, कामगार व कष्टकरी कुटुंबांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आत्तापर्यंत२६ हजार ८९९ बांधकाम कामगारांची नोंदणी झाली असून, बांधकाम क्षेत्रातील २१ प्रकारांतील योजनांसाठी पात्र कामगारांनी नोंदणी केल्यास ही संख्या ५० हजारांपर्यंत जाऊ शकते. गेल्या काही वर्षांत शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक आणि आर्थिक योजनांअंतर्गत बांधकाम कामगारांना तब्बल १२ कोटी २७ लाख रुपयांचा लाभ देण्यात आला असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले ज्या लाभार्थ्यांची नोंदणी व मंजुरी झाली आहे त्यांना शंभर टक्के भांडे संच मिळणार आहेत.जर काही लाभार्थींना साहित्य उपलब्धतेअभावी वाटप होऊ शकले नसले तरी पुढील टप्प्यात सर्वांना लाभ दिला जाईल. त्यासाठी पुन्हा हा कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. **संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील साकुर जवळील मांडवे गावात काही व्यक्ती कामगारांकडून पैसे घेत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे संबंधितांची बांधकाम अधिकाऱ्यांनी चौकशी करून त्या एजंटवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी बांधकाम अधिकाऱ्यांना दिले.**

# संपादकीय...

## पर्यावरणातील बदलांचा कृषी क्षेत्रासमोरील नवा संघर्ष

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतीचे भविष्य आज हवामान बदलाच्या गंभीर आव्हानांसमोर उभे आहे. भारतातील सुमारे निम्म्याहून अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात मान्सून हा केवळ ऋतू नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. पावसाचे आगमन, त्याचे प्रमाण, वितरण आणि कालावधी यावर शेतीचे यश-अपयश अवलंबून असते. परंतु गेल्या काही दशकांत हवामान बदलामुळे मान्सूनच्या स्वरूपात मोठे बदल दिसून येत आहेत. त्यामुळे शेतीतील अनिश्चितता वाढत असून शेतकऱ्यांपुढे आर्थिक, सामाजिक आणि मानसिक स्वरूपाची अनेक संकटे निर्माण होत आहेत. पूर्वी मान्सून ठराविक वेळेत सुरू होऊन नियमितपणे पाऊस देत असे. त्यामुळे पेरणी, पीक व्यवस्थापन आणि काढणी यांचे नियोजन तुलनेने सुलभ होते. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. कधी पावसाचे आगमन उशिरा होते, तर कधी वेळेआधीच मुसळधार पाऊस पडतो. काही भागांत दीर्घकाळ दुष्काळी परिस्थिती निर्माण होते, तर काही ठिकाणी काही तासांतच महिनाभराचा पाऊस कोसळतो. या असमतोलामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतकऱ्यांनी केलेला खर्च वाया जात असून उत्पादनात घट होत आहे. हवामान बदलाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे तापमानातील सातत्याने होणारी वाढ. जागतिक तापमानवाढ ही आज संपूर्ण जगासमोरील गंभीर समस्या बनली आहे. औद्योगिकीकरण, जंगलतोड, जीवाश्म इंधनांचा वाढता वापर आणि कार्बन उत्सर्जनामुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे. या तापमानवाढीचा थेट परिणाम पर्जन्यमानावर होत आहे. वातावरणातील बदलांमुळे मान्सूनचे चक्र विस्कळीत होत असून पावसाच्या पद्धतीत मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये गेल्या काही वर्षांत अतिवृष्टी आणि दुष्काळ यांची वारंवारता वाढली आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये कधी तीव्र पाणीटंचाई तर कधी अचानक पूरस्थिती निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडून पडते. खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी आणि मका यांसारख्या पिकांवर याचा विशेष परिणाम होत आहे. पेरणीनंतर पाऊस खंडित झाल्यास उगवण कमी होते, तर काढणीच्या वेळी झालेला अवकाळी पाऊस उत्पादनाचे आणि गुणवत्तेचे नुकसान करतो. फळबागा आणि भाजीपाला क्षेत्रालाही हवामान बदलाचा मोठा फटका बसत आहे. द्राक्षे, डाळिंब, कांदा, टोमॅटो, संत्री आणि आंबा यांसारख्या पिकांवर तापमानातील बदल आणि अनियमित पर्जन्यमानाचा विपरीत परिणाम दिसून येतो. अनेकदा रोगराई आणि कीड प्रादुर्भाव वाढतो. परिणामी उत्पादन खर्च वाढतो आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते. हवामानातील बदलामुळे शेतीचे जोखीम व्यवस्थापन अधिक कठीण बनत आहे. मान्सूनमधील अनिश्चिततेचा परिणाम जलस्त्रोतांवरही होत आहे. पाऊस कमी किंवा असमान झाल्यास धरणे, तलाव, विहिरी आणि भूजलसाठे पुरेशा प्रमाणात भरत नाहीत. त्यामुळे सिंचनाची समस्या निर्माण होते. दुसरीकडे अतिवृष्टी झाल्यास मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते आणि जलसंधारणाची संधी दवडली जाते. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक गंभीर बनते. त्यामुळे शेतीबरोबरच संपूर्ण ग्रामीण जीवनमानावर परिणाम होतो. हवामान बदलामुळे कृषी उत्पादनात घट होण्याचा परिणाम देशाच्या अन्नसुरक्षेवरही होऊ शकतो. वाढती लोकसंख्या आणि बदलती अन्नाची गरज लक्षात घेतल्यास भविष्यात अन्नधान्य उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. परंतु हवामानातील अस्थिरतेमुळे उत्पादनावर विपरीत परिणाम होत राहिल्यास अन्नधान्य पुरवठा आणि किमतींवर ताण निर्माण होऊ शकतो. यामुळे महागाई वाढण्याची शक्यता निर्माण होते.

या परिस्थितीत शाश्वत आणि हवामानस्नेही शेती पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, ठिबक आणि तुषार सिंचन, सेंद्रिय शेती, पीक विविधीकरण आणि मृदासंवर्धन यांसारख्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. कमी पाण्यावर येणारी आणि हवामान बदलाला अधिक सहनशील असलेली पिके स्वीकारण्याची गरज आहे. तसेच हवामान अंदाज प्रणाली अधिक अचूक आणि गावपातळीपर्यंत पोहोचविणेही महत्त्वाचे आहे. सरकारनेही हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर कृषी धोरणांमध्ये आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. पीक विमा योजना अधिक प्रभावी करणे, शेतकऱ्यांना हवामानविषयक तांत्रिक माहिती उपलब्ध करून देणे, जलव्यवस्थापनावर भर देणे आणि संशोधनाद्वारे हवामानसहिष्णू वाण विकसित करणे ही काळाची गरज आहे. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि प्रशासन यांच्यात अधिक समन्वय निर्माण झाला पाहिजे. शेतकऱ्यांनीही बदलत्या परिस्थितीची जाणीव ठेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

## ज्ञानमाता विद्यालयात प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच १५ जून रोजी ज्ञानमाता विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी इयत्ता पाचवी ते आठवी तील नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक स्वरूपात औक्षण करून, त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली आणि ढोल ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले.

सदर प्रसंगी संगमनेर नगरपरिषद येथील नगरसेवक अमजद पठाण व सोबत श्री अमित गुंजाळ तसेच विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, पेन, शालेय पाठ्यपुस्तक यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना फादर पटेकर यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना शालेय शिस्त अंगीकारावी व नवीन विद्यार्थ्यांची काळजी घ्यावी. तसेच विद्यार्थी जीवनात अभ्यास अत्यंत महत्त्वाचा असल्याने, प्रामाणिकपणे नियमित अभ्यास करावा असे मत व्यक्त केले. कार्यक्रम प्रसंगी श्री अमित गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ तेजश्री फटांगरे यांनी केले. यावेळी उपप्राचार्या अर्चना डोंगरे, पर्यवेक्षक फादर प्रशांत, कनिष्ठ महाविद्यालय समन्वयक शारदा नवले व सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## पारेगाव बुद्रुक जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कीटचे वाटप



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामीण भागातील गरजू मुलांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य मिळावे या उद्देशाने संगमनेर अकोले तालुक्यातील १०७ शाळांना चार हजार किटचे वाटप नुकतेच उद्योजक श्रीकृष्ण बुब व परिवार, पायल मुजुमदार, भानुदास आभाळे यांचे हस्ते करण्यात आले.

संगमनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारेगाव बुद्रुक या शाळेतील १०० विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाच्या शालेय किटचे वाटप करण्यात आले. उत्तम दर्जा असलेली सॅक,दर्जेदार वह्या, चित्रकला वही, रंगपेटी, पाटी, पेन, पेन्सिल, चौथीपर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिका आदी साहित्य ग्रामीण भागातील गरजू मुलांना मिळाल्यामुळे त्यांचा आनंद द्विगुणित झाला.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरदराव गडाख,शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव गायकवाड, यांचे सह सर्व शिक्षक, पालक यावेळी उपस्थित होते. यावेळी शाळेच्या वतीने श्री राम नारायणजी बुब ट्रस्ट पुणे, अप्रोच हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशन, आधार फाउंडेशन संगमनेर या संस्थांचे विशेष आभार मानण्यात आले.


**भाड्याने देणे**

संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.

संपर्क 9922008706

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS SAMREEN AZIZ SHAIKH TO NEW NAME AS SAMRIN SAMIR SHAIKH

UIDAI 665013880612 ADRESS - SANGAMNER ROAD, A/P - KURAN, TAL - SANGAMNER DIST - AHMEDNAGAR 422605

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS SHAIKH WAJEDA TABASSUM BADRUDDIN TO NEW NAME AS WAJEDA RAISKHAN PATHAN

UIDAI 670688998582 ADRESS - SANGAMNER ROAD, A/P - JAMA JASJID, NAIKWADPURA, SANGAMNER 422605

**पाहिजेत**

संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत. टू व्हिलर आवश्यक

8999795056

**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फर्मसाठी

सेल्समन -3

सुपर कॅरी ड्रायव्हर - 1

कामाचा अनुभव आवश्यक

9423793758

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५

महिला - ३

सफाई कर्मचारी - ५

हेल्पर - ५

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846


### संगमनेर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन.

महसूल निवास, शिवाजी पुतळ्याजवळ, संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**

जा.क्र. ०७/२०२६/२७ दिनांक : १८/०६/२०२६

**प्रथम लिलाव नोटीस**

**स्थावर मिळकत विक्रीचा जाहिरनामा**

(महाराष्ट्र सहकारी संस्था, नियम १९६१ चा नियम १०७ (११) प्रमाणे)

**शिवकृपा ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. खांडगाव**

ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी **शिवकृपा ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. खांडगाव** यांचे थकबाकीदार खाली नमुद केलेली स्थावर मालमत्ता व दि. ०१/०८/२०२३ पासुन होणारे व्याज, येणे रकमेचे वसुलीसाठी **जा.क्रमांक ११०१, ११०२** दि. २०/०५/२०२६ या स्थावर मिळकत जप्ती आदेशान्वये जप्त करण्यात आली आहे. आणि ज्याअर्थी सदर येणे रक्कम व त्यावरील व्याज आणि वसुली खर्च वसुल करण्यासाठी सदर मिळकतीची विक्री करणे आवश्यक आहे. त्याअर्थी नोटीस देऊन जाहिर करण्यात येते की, दि. १८/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता विशेष वसुली व विक्री अधिकारी हे मौजे **संगमनेर / खांडगाव** हद्दीतील येथे खाली नमुद केलेल्या मालमत्तेवरील हक्क दावा व हितसंबंध आणि मालत्तेची अथवा त्यातील काही भागांची किंवा त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नाची अथवा फायद्याची विल्हेवाट लावणेचा अधिकरी यादव एन.एस. यादव हे आपल्या हितासाठी कायदेशीर रितीने हक्क चालवु शकतात तो अधिकार जाहिर लिलाव करुन सर्वाहुन अधिक रक्कम बोलेल त्यात लिलावात पुकारलेल्या बाजवी किंमत वसुली बाबतच्या शर्तीस व सोबत जोडलेल्या विक्री शर्तीचे परिशिष्ठात नमुद केलेल्या अटीस अनुसरुन लिलावाने विक्री करतील.

**❊ स्थावर मिळकतीचे वर्णन (मोकळी जागा/घर/शेती) ❊**

| ग.नं. स.नं. सि.स.नं. | थकबाकी | जागेवर वर्णन व त्या स्थावर इस्टेटीवर कोणाचा चार्ज आहे तो तपशील | हल्लीच्या कब्जेदाराचे नाव व गाव (रेकॉर्डप्रमाणे) | भुमापन क्र. नगरपालिका सि.स. क्र. व प्लॉट क्रमांक | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|---|
| २९४३ अ. | ९,१८,४२०/- | मदन गोपाल परदेशी | मदन गोपाल परदेशी संगमनेर | - | ३२.०० (९९.५३) |
| ९६/९ | २,८२,३४७/- | माधव मारुती रुपवते | माधव मारुती रुपवते | - | ०.६४ |

टीप :- १) सदर मिळकतीवरील दाव्याविषयी अथवा इतर कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने दावा केलेले हक्क दावे अथवा हितसंबंधाबाबत यापैकी कशाच्याही खरेपणा बद्दल हमी दिलेली नाही. २) ज्या रकमेचे वसुलीसाठी मालत्ता विक्री करावयाची आहे ती थकबाकीदार यांचेकडे येणे असलेली मुद्दल रक्कम आज पावेतो वसुली दाखल्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे रु. ९१८४२०/-, २८२३४७/- व दि. १/०८/२०२३ पासून होणारे व्याज इतकी आहे. त्यावरील व्याज व वसुली खर्च येणे आहे.

❊ ठिकाण :- खांडगाव

❊ दिनांक :- १८/०६/२०२६

❊ लिलावाचे दिनांक व वेळ : दि. १८/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा.

सही /- एन.एस.यादव
विशेष वसुली व विक्री अधिकारी
मोबा. ९८२२१०११५६


**SLH ADVISORS PVT LTD**

TAX | ACCOUNTING | CONSULTING

WE ARE HIRING JOIN OUR TEAM 05

Marketing Executive 02
B.Com./M.Com./MBA, Salary - Rs. 25,000/-

TeleCaller (Female) 02
Graduate Preferred, Salary - Rs. 15,000/-

Digital Marketing Executive
Graduate, MBA, Salary - Rs. 20,000/-
SEO, Google Ads, Content Creation Experience

Contact : 7666387377

SLH Advisors Pvt. Ltd., Saish Business Park, Near Kavi Anant Fandi Natyagruha, Sangamner

**पाहिजेत**

माऊली ग्रीन सोल्युशन येथे कामासाठी मुले पाहिजेत

सोलर, सीसीटिव्ही, संगणक सिस्टीममध्ये तांत्रिकज्ञान आवश्यक

7588095215
7888095215

**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.

हेल्पर - ०२

ड्रायव्हर - ०१

सेल्समन - ०१

संपर्क- नेहरु चौक, संगमनेर

9922113534
9730468090

**भाड्याने देणे आहे**

संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी

२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे

- पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन
- वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
- थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध
- व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा

पत्ता : नाशिक - पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर

- संपर्क - 9822258458







**पाहिजेत**

इथापे इन्स्टिटयूट करीता खालील पदे भरणे आहेत

अकाऊंटट -३ क्लार्क -३

ड्रायव्हर-३ वॉचमन- ३

तरी संबंधीतांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह समक्ष भेटावे

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

# पुणे-अहिल्यानगर- शिर्डी रेल्वेमुळे विकासाला मोठी गती मिळणार - डॉ. सुजय विखे पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- पुणे ते शिर्डी दरम्यान पहिल्यांदाच थेट रेल्वेसेवा सुरू होत असून, यामुळे साईभक्तांसह हजारो प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत या नव्या रेल्वेसेवेचे उद्घाटन बुधवारी (१७ जून) करण्यात आले.

भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. ते म्हणाले, शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. पुण्याहून मिळालेल्या या पहिल्या थेट रेल्वे सुविधेमुळे लाखो भाविकांची मोठी सोय होणार असून धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी पुणे-शिर्डी थेट रेल्वेसेवा सुरू झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा विकासाचे कौतुक केले. ते म्हणाले की, गेल्या काही वर्षांत रेल्वे क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडून आले असून नवीन रेल्वेमार्ग, आधुनिक स्थानके, वंदे भारतसारख्या अत्याधुनिक गाड्या आणि प्रवाशांसाठी वाढलेल्या सुविधा यामुळे भारतीय रेल्वेचा चेहरामोहरा बदलत आहे.पुणे-शिर्डीसारख्या महत्त्वाच्या मार्गांवर थेट रेल्वेसेवा उपलब्ध करून देण्यामागे केंद्र सरकारची विकासाभिमुख भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरांना जोडण्यावर विशेष भर दिला जात आहे. पुणे-अहिल्यानगर-शिर्डी रेल्वेसेवा ही त्याच दृष्टीकोनाचा भाग असून यामुळे भाविक, विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिक यांना मोठा फायदा होणार आहे. रेल्वे नेटवर्कच्या विस्तारामुळे पर्यटन, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत असून विकसित भारताच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचेही डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. दररोज धावणारी ही रेल्वे पुणे, अहिल्यानगर, राहुरी, श्रीरामपूर मार्गे शिर्डीपर्यंत धावणार आहे. त्यामुळे केवळ भाविकांच्याच नव्हे तर विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिकांच्याही प्रवासाचा वेळ व खर्च कमी होणार आहे. पुण्यातील शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांपर्यंत पोहोचणे ता अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील नागरिकांसाठी अधिक सुलभ होणार आहे.

यापूर्वी पुण्यातून शिर्डीसाठी थेट आणि नियमित रेल्वे उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रवाशांना बस किंवा खासगी वाहनांचा पर्याय निवडावा लागत होता. नव्या रेल्वेसेवेमुळे प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि किफायतशीर होणार आहे. दरवर्षी देश-विदेशातून लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. अशा परिस्थितीत पुणे-शिर्डी थेट रेल्वेसेवा सुरू झाल्याने धार्मिक पर्यटन, व्यापार, दळणवळण आणि प्रादेशिक विकासाला मोठी गती मिळणार असल्याचे मानले जात आहे.

# सामाजिक, राजकीय आंदोलनातील ४४ खटले मागे घेण्याचा मंत्रिमंडळ उपसमितीचा निर्णय



युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर

राज्यातील धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल झालेले ४४ खटले मागे घेण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला असून तशी शिफारस शासनाला करण्यात आली आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमता मंत्री तथा या उपसमितीचे अध्यक्ष ड. आशिष शेलार यांनी दिली. राज्यातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले खटले मागे घेण्याबाबत ड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. या समितीची आज सह्याद्री अतिथी गृह येथे बैठक झाली. विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव, अभियोग संचालनालयाचे संचालक, गृह विभागाच्या अधिकाऱ्यांसह राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

यापूर्वी झालेल्या बैठकीत ७७ खटले मागे घेण्यात आले होते; तर आज ४४ खटले मागे घेण्याची शिफारस करण्यात आली. या समितीच्या बैठकीत पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या १३३ अर्जदारापैकी ४४ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक व दिवाणी प्रकरणे ही शासनाच्या धोरणांतर्गत माफ केली जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा प्रकरणावरील खटले मागे घेण्यास स्पष्ट नकार देण्यात आला. मंत्रिमंडळ उपसमितीकडे प्राप्त १३३ अर्जदारापैकी १४ अर्जावर पुन्हा विचार करण्याची शिफारस करण्यात आली असून ही प्रकरणे पोलीस उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त क्षेत्रीय समितीपुढे ठेवण्यात येतील; तसेच ३५ प्रकरणापैकी काही खटले निकाली निघाले होते तर ३२ खटले हे समितीच्या कार्यकक्षेत न येणारे होते. आज आलेल्या खटल्यापैकी केवळ ८ खटले प्रलंबित राहिले आहेत. सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, आंदोलक, विचारधारात्मक चळवळींतील सहभागी यांच्यावर विनाकारण खटले दाखल करण्यात आले होते. अशा अनावश्यक खटल्यांपासून त्यांची मुक्तता करणे; हे सरकारचे उत्तरदायित्व असल्याचे मंत्री ड. शेलार यांनी सांगितले.

आज मागे घेण्यात आलेल्या खटल्यांमध्ये गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, सामाजिक कार्यक्रम, गोवंश संरक्षण आंदोलन, कामगार आंदोलन अशा विविध खटल्याचा समावेश आहे.

# संगमनेर आगाराला १५८ फेऱ्यांतून ३७ लाखांचे उत्पन्न



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अधिक मासाच्या पवित्र पर्वकाळात पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविकांनी गर्दी केली. अशात संगमनेरातील हजारो भाविकांच्या सेवेसाठी संगमनेर आगाराने विशेष बससेवेचे नियोजन केले होते. या सेवेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आर्थिकदृष्ट्या मोठी भरारी घेत ३७लाख ३९ हजार ७१८ रुपयांचे उत्पन्न मिळाले, अशी माहिती आगारप्रमुख प्रशांत गुंड यांनी दिली.

संगमनेर आगाराने विशेष बसफेऱ्यांचे नियोजन केले होते. आगारातून पंढरपूरसाठी दररोज सरासरी पाच एसटी बस सोडण्यात येत होत्या. भाविकांची वाढती मागणी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अतिरिक्त व्यवस्थाही करण्यात आली होती.

अधिक मासाच्या संपूर्ण कालावधीत आगारातून पंढरपूरसाठी १५८ विशेष फेऱ्या पार पडल्या. या फेऱ्यांमधून ४५ हजार ४५६ किलोमीटरचे अंतर कापण्यात आले. विशेष म्हणजे या सेवेद्वारे २० हजार ४८६ भाविकांनी सुरक्षित आणि सुखकर प्रवास केला. भाविकांच्या सोयीसाठी आगार प्रशासनाने बसची वेळ, प्रवाशांची ह सुरक्षितता, वाहतुकीचे नियोजन आणि आवश्यक सुविधा यांवर विशेष भर दिला होता. अनेक भाविकांनी खासगी वाहनांपेक्षा एसटी सेवेचा पर्याय निवडल्यामुळे प्रवास खर्चातही बचत झाली. आगाराच्या कर्मचाऱ्यांनीही भाविकांची सेवा हेच आपले कर्तव्य मानून नियोजनबद्ध काम केले. चालक, वाहक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून ही विशेष मोहीम यशस्वी ठरली.

# एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटची यशस्वी कामगिरी

## १०० दिवसांत १०० 'की-होल' हृदय शस्त्रक्रिया



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - जागतिक दर्जाची आरोग्यसेवा तेही मोफत आणि परवडणाऱ्या दरात पुरवणाऱ्या एसएमबीटी हॉस्पिटलने वैद्यकीय क्षेत्रात मानाचा तुरा खोवण्यात यश मिळवले आहे. 'एसएमबीटी हार्ट इन्स्टिटयूट'च्या तज्ज्ञ कार्डियाक सर्जनच्या टीमने अत्यंत क्लिष्ट मानल्या जाणाऱ्या '१०० दिवसांत १०० मिनिमली इन्व्हेजिव्ह कार्डियाक शस्त्रक्रिया' ज्याला सर्वसामान्यांच्या भाषेत 'की-होल सर्जरी' म्हटले जाते या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्याची कामगिरी केली आहे. इतरत्र कुठेही जागतिक दर्जाचे हे उपचार शासकीय योजनांच्या माध्यमातून पूर्णपणे मोफत झाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील शेकडो रुग्णांना वेदनामुक्त आणि सुरक्षित नवजीवन मिळाले आहे.

हृदयविकार किंवा बायपास शस्त्रक्रिया करायची असल्यास छातीचा मधला भाग (बरगड्या) पूर्णपणे कापावा लागतो हे सर्वज्ञात आहे. मात्र, एसएमबीटी हॉस्पिटलच्या अत्याधुनिक मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्समध्ये उपलब्ध असलेल्या **'MICS'** तंत्रज्ञानामुळे आता केवळ काही मिलिमीटर ते सेंटीमीटर आकाराचे लहान छिद्र घेऊन अत्यंत सुलभतेने या शस्त्रक्रिया पार पाडल्या जातात. छातीचे हाड न कापता डाव्या बाजूला छोटा कट देऊन केली जाणारी बायपास सर्जरी. हार्ट व्हॉल्व्ह रिपेअर आणि रिप्लेसमेंट, हृदयाचे निकामी झालेले झडप (व्हॉल्व्ह) बदलणे किंवा दुरुस्त करणे. जन्मजात हृदयातील छिद्र बंद करणे, लहान मुलांच्या किंवा मोठ्यांच्या हृदयातील छिद्र लहान चिरा देऊन बंद करणे. कार्डियाक ट्यूमर रिमूव्हल हृदयातील गाठी काढणे. यासारख्या अनेक शस्त्रक्रियांचा समावेश आहे.

एसएमबीटी हार्ट इन्स्टिटयूटच्या माध्यमातून आतापर्यंत तब्बल ३० हजारांपेक्षा अधिक रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया आणि प्रक्रिया (प्रोसिजर्स) झाल्या आहेत. नवजात बालकांपासून ते अगदी वयोवृद्धांपर्यंत सर्व प्रकारच्या हृदय शस्त्रक्रिया येथे केल्या जातात. विशेष म्हणजे, एसएमबीटी हॉस्पिटल ना नफा ना तोटा या तत्वाने कार्य करत आहे. त्यामुळे शासकीय योजनेत याठिकाणी या अद्यायवत शस्त्रक्रिया समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

> **अनेक रुग्ण रक्तवाहिन्यांच्या त्रासामुळे बायपासचा सल्ला दिल्यानंतर 'ओपन हार्ट' सर्जरीच्या भीतीने उपचार लांबणीवर टाकतात. अशा रुग्णांसाठी 'की-होल' म्हणजेच मिनिमली इन्व्हेझिव्ह सर्जरी हे वरदान ठरत आहे. यात आम्ही छातीचे हाड कापण्याऐवजी बरगड्यांच्या मधून एक लहान छिद्र करून बायपास किंवा व्हॉल्व्हची शस्त्रक्रिया करतो. यामुळे रुग्णाचा जीव धोक्यात येत नाही, हाडाला दुखापत होत नाही आणि रुग्ण अगदी ३ ते ४ दिवसांत स्वतःच्या पायावर उभा राहून घरी जाऊ शकतो.**
>
> **डॉ. विद्युतकुमार सिन्हा**
>
> **हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ञ, एसएमबीटी हॉस्पिटल**

दुसरीकडे इतर हॉस्पिटल्समध्ये याच शस्त्रक्रीयांना ३ ते ५ लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. यात अत्याधुनिक शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, बायपास आणि बालहृदयरोग शस्त्रक्रिया यांचा समावेश असून एसएमबीटीत या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केल्या जात आहेत. एसएमबीटी हॉस्पिटलपासून अगदी जवळच समृद्धी महामार्गाचा इंटरचेंज असल्यामुळे विदर्भ व मराठवाड्यातील (नागपूर, अमरावती, बुलढाणा, जालना) रुग्णांना हे हॉस्पिटल अत्यंत जवळचे व सोयीचे झाले आहे. यासोबतच मध्यप्रदेश, ठाणे, पालघर, कल्याण, भिवंडी या भागातील रुग्णांचा ओघ वाढला आहे. रुग्णांच्या सोयीसाठी नाशिक आणि कसाऱ्याहून 'आरोग्यरथ' ही मोफत बससेवा दररोज चालवली जाते, तर कल्याण-भिवंडीहून एसटी महामंडळ आणि मोफत बससेवादेखील सुरु करण्यात आल्या आहेत.

# फुटीर खा. वाकचौरेंविरोधात...

पान १ वरून -

लोकसभा मतदारसंघात फिरू देणार नाही. आगामी काळात जनतेसमोर त्यांचा खरा चेहरा आणण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनात उपजिल्हाप्रमुख अमर कतारी, शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, संभव लोढा, भीमाशंकर पावसे, अशोक बढे, अमोल डुकरे, अरुण भालेराव, रवी गिरी, बाळासाहेब घोडके, आसिफ तांबोळी, दीपक साळुंखे, राजाभाऊ सातपुते, प्रकाश गायकवाड, सदाशिव हासे, गणेश धात्रक, राजश्री राहणे, त्रिलोक कतारी, आदित्य गायकवाड, प्रशांत खजूरे, कैलास गायके, त्र्यंबक शिंदे यांच्यासह महिला आघाडीच्या पदाधिकारी व मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

शिर्डी लोकसभा मतदारसंघातील जनतेच्या विश्वासाला तडा देत वारंवार पक्षांतर करणाऱ्या खासदारांविरोधात कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून आगामी काळात हा रोष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# ठाकरेंचा व्हिप डावलला

पान १ वरून -

लोकसभा अध्यक्ष यांना पुन्हा एक पत्र लिहून ६ खासादारंनी व्हीपचं उल्लंघन केल्याची माहिती देणार अशी सूत्रांची माहिती आहे. शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार शिंदेंच्या गळाला लागले आहेत. या ६ खासदारांनी वेगळा गटही स्थापन केला आहे आणि तसं पत्र लोकसभा अध्यक्षांना दिल्याची माहिती आहे. ऑपरेशन टायगर यशस्वी झालेले असून आता लगेच काहीही जाहीर करायचे नाही, कोणतेही पुरावे द्यायचे नाही असं शिंदे शिवसेनेकडून ठरवण्यात आल्याचं कळते. ठाकरे गटाचे कायदेशीर डावपेच बघूनच पुढील पावले टाकली जातील. पुढील २ दिवस तरी अधिकृतरित्या काहीही समोर आणले जाणार नाही, अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली आहे. अतिशय काटेकोरपणे आणि नियोजन पद्धतीनं ऑपरेशन टायगर राबवलं गेल्याची माहिती हळूहळू समोर येत आहे. रात्रभरात दिल्लीत वायूवेगाने घडामोडी घडत गेल्या. दरम्यान खासदारांचा स्वतंत्र गट लवकरच शिवसेनेत विलीन करण्यात येणार असून शिंदेंचे ६ खासदार लवकरच शिवसेनेत प्रवेश करुन आपली बाजू मांडतील, असं सांगण्यात येत आहे.

# कथाकथन उपक्रमासाठी नावनोंदणी सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी) -संगमनेर -नुकतेच येथील अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्था , शाखा संगमनेर तर्फे कथाकथन उपक्रमाची नावनोंदणी सुरु झाल्याची माहिती संस्थेचे सचिव व प्रकल्प प्रमुख दर्शन जोशी व माजी मुख्याध्यापक शांताराम डोंगरे यांनी दिली आहे. या उपक्रमात संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन मनोरंजनात्मक बोधकथा सांगावयाची आहे.या कथाकथन उपक्रमासाठी इयत्ता पहिली ते चौथी , इयत्ता पाचवी ते दहावी , अकरावी व बारावी असे तीन गट असून इच्छुकांनी आपल्या वीस मिनीटांच्या कथेचे नाव आणि कथेतून मिळणारा संदेश याचा खुलासा करावा व त्यानंतरच आपली नावनोंदणी केली जाईल. त्याचबरोबर ज्यांना विविध कला,कृतियुक्त गीते,नाट्यछटा,जादूचे प्रयोग,पपेट शो ,वैज्ञानिक प्रयोग वगैरे कला विद्यार्थ्यांपुढे सादर करायच्या असतील त्यांनी श्री.दर्शन जोशी ७९७२८४९४३५ व श्री.शांताराम डोंगरे सर ९९२१५२१७२१ यांचेकडे लवकरात लवकर नावे नोंदवावीत असे आवाहन करण्यात आले आहे.

# सत्यशोधक समाजाचे ओतूर येथे राज्यस्तरीय अधिवेशन

युवावार्ता (प्रतिनिधी) अकोले -

फुले दाम्पत्याची कर्मभूमी राहिलेल्या पुणे जिल्ह्यातील ओतूर येथे दिवाळीनंतर सत्यशोधक समाजाचे राज्यस्तरीय अधिवेशन घेण्यात येणार असून, या कालावधीत शिव जन्मभूमी ते फुले वाडा अशी पदयात्रा काढण्याचा मनोदय ओतूर येथे पार पडलेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. महात्मा जोतिबा फुले यांचे हे द्विजन्मशताब्दी वर्ष आहे. १७८ वर्षांपूर्वी फुले दाम्पत्याने ओतूर येथे ग्रामीण भागातील मुलींसाठी पहिली शाळा काढली आहे. आजही ही शाळा जोमाने चालू असून, एक ते चार या वर्गाची पटसंख्या २५० पेक्षा जास्त आहे. फुले दाम्पत्य या शाळेत दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ राहिले होते. ज्ञानार्जनाचे काम सावित्रीबाई फुलेंनी केले होते. फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या अनुयायांची संख्या येथे लक्षणीय आहे, म्हणूनच या गावाधी सत्यशोधकांचे ओतूर अशीच ओळख आहे. अशी पार्श्वभूमी असलेल्या या गावात रविवारी सत्यशोधकांची बैठक पार पडली. येथील डुंबरे पाटील प्रतिष्ठानने याकामी पुढाकार घेतला.









ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्

# ऊसतोड महिलांच्या आरोग्यविषयक राज्यस्तरीय समितीवर गणेश बोऱ्हाडे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर समस्यांवर उपाययोजना, मार्गदर्शक सूचना आणि शासनाला शिफारशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीवर संगमनेरचे सामाजिक कार्यकर्ते गणेश बोऱ्हाडे यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला असून, त्यांच्या नियुक्तीचे विविध स्तरांतून स्वागत आणि अभिनंदन होत आहे.



बीड जिल्ह्यातील काही खाजगी रुग्णालयांमध्ये महिलांच्या गर्भाशय काढून टाकण्याच्या (हिस्टरेक्टॉमी) शस्त्रक्रियांच्या वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने यापूर्वी तपासणीसाठी समिती गठीत केली होती. त्यानंतर ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्यविषयक समस्या, विशेषतः गर्भाशय काढण्याच्या वाढत्या घटनांबाबत अभ्यास व उपाययोजना करण्यासाठी डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीचे पुनर्गठन करण्यात आले आहे.

शासन निर्णय क्रमांक प्रचिनि-३१२६/प्र.क्र.१२/कु.क.२ (ई-१५४६९९५) नुसार गणेश बोऱ्हाडे यांचा या समितीत निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या बोऱ्हाडे यांनी स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती आणि विविध लोकहिताच्या उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक कार्याची दखल घेत शासनाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याने संगमनेरसह अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. विशेषतः ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर काम करणाऱ्या या समितीत त्यांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

गणेश बोऱ्हाडे यांच्या नियुक्तीबद्दल सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण आणि महिला क्षेत्रातील विविध संघटना, कार्यकर्ते तसेच मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संगमनेरकरांच्या रेल्वे स्वप्नावर पाणी

## सरळ मार्ग रद्द, अहिल्यानगर - शिर्डी रेल्वे मार्गाला मंजूरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरवासीयांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पुणे-नाशिक थेट सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग अखेर रद्द करण्यात आला असून, केंद्र सरकारने पुणे-अहिल्यानगर-शिर्डी-नाशिक असा पर्यायी मार्ग स्वीकारल्याची घोषणा केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. या निर्णयामुळे नाशिक-संगमनेर-पुणे या सरळ आणि कमी अंतराच्या मार्गाने रेल्वे सुरू होण्याच्या संगमनेरकरांच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत.




पुणे रेल्वे स्थानकावर पुणे-शिर्डी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवताना रेल्वेमंत्री वैष्णव यांनी थेट पुणे-नाशिक रेल्वेमार्ग तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याचे स्पष्ट करत नवीन मार्गावरील कामाला सुरुवात झाल्याची माहिती दिली. मात्र, या नव्या मार्गामुळे संगमनेर तालुक्याला पुन्हा एकदा विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, नाशिक आणि पुणे या दोन प्रमुख शहरांच्या दरम्यान असलेल्या संगमनेरमधून सरळ रेल्वेमार्ग गेल्यास कमी अंतर, कमी खर्च आणि प्रवाशांसाठी अधिक सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध झाली असती. तसेच संगमनेर, सिन्नर, अकोलेसारख्या भागातील औद्योगिक, कृषी व व्यापारी क्षेत्राला मोठी चालना मिळाली असती. परंतु सरळ मार्गाला फाटा देत अहिल्यानगर व शिर्डीमार्गे वळसा घेणारा रेल्वेमार्ग निश्चित करण्यात आल्याने संगमनेरकरांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

संगमनेर हे राज्यातील वेगाने विकसित होणारे व्यापारी, औद्योगिक आणि कृषी केंद्र असूनही प्रत्येक मोठ्या रेल्वे प्रकल्पात या भागाला डावलले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. समृद्धी महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग आणि औद्योगिक गुंतवणुकीनंतर आता रेल्वे प्रकल्पातूनही संगमनेर वगळले गेल्याने संगमनेरच्या विकासाकडे केंद्र आणि राज्य सरकारचे दुर्लक्ष सुरूच असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिक, व्यापारी, उद्योजक आणि विविध संघटनांनी नाशिक-संगमनेर-पुणे या सरळ रेल्वेमार्गाचा पुनर्विचार करण्याची मागणी केली असून, संगमनेरला रेल्वे नकाशावर स्थान मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी ठोस भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### आ. तांबे यांच्याकडून निषेध

केंद्र सरकारने नाशिक–पुणे सरळ रेल्वेमार्गाचा प्रस्ताव रद्द केल्याने उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला मोठा धक्का बसल्याची प्रतिक्रिया विधान परिषद सदस्य सत्यजित तांबे यांनी दिली. आर्थिक निकषांवर घेतलेल्या या निर्णयामुळे नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांच्या विकासावर विपरीत परिणाम होणार असल्याचे त्यांनी म्हटले. नाशिक–सिन्नर–संगमनेर–अकोले–नारायणगाव–राजगुरुनगर–चाकण–पुणे हा प्रस्तावित रेल्वेमार्ग उद्योग, व्यापार, शिक्षण, पर्यटन आणि रोजगारासाठी महत्त्वाचा ठरला असता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयात हस्तक्षेप करून प्रकल्प वाचवावा, अशी मागणी तांबे यांनी केली आहे. सरळ रेल्वेमार्ग झाल्यास नाशिक–पुणे प्रवासाचा वेळ सुमारे पावणेदोन तासांवर आला असता. मात्र प्रकल्प रद्द करून सरकारने जनतेच्या अपेक्षांवर पाणी फेरल्याचा आरोप करत तांबे यांनी या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदविला. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी देखील केंद्र सरकारच्या निर्णयावर संताप व्यक्त केला आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# अमेरिका-इराण शांतता कराराचा तेल बाजारावर परिणाम

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिका आणि इराण यांच्यातील दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी १४ कलमी शांतता करारावर स्वाक्षरी केली असून, यामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी हालचाल दिसून आली आहे. करारानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईलच्या किमती घसरल्या असून ब्रेंट क्रूडचा दर १.५३ टक्क्यांनी कमी होऊन ७८.३३ डॉलर प्रति बॅरलवर आला आहे.

इस्लामाबाद मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडिंग बिटवीन द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका अँड द इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या करारामुळे मध्यपूर्वेतील तणाव कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे जागतिक बाजारात तेलपुरवठा सुरळीत राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.जागतिक बाजारातील घसरणीचा परिणाम अनेक देशांमध्ये पेट्रोलच्या दरांवर दिसून येत आहे. पाकिस्तानमध्ये पेट्रोलची सरासरी किंमत १३०.८२ रुपयांवरून १२६.८४ रुपयांवर आली आहे. चीनमध्ये पेट्रोलचे दर १३२.८१ रुपयांवरून १५२५.३१ रुपये प्रति लिटरवर घसरले आहेत. नेपाळमध्ये पेट्रोलचा दर १३६.४१ रुपयांवरून १३५.४७ रुपये प्रति लिटर झाला आहे. बांगलादेशात पेट्रोलची किंमत ११२.६८ रुपयांवरून १११.५१ रुपयांपर्यंत खाली आली आहे. श्रीलंकेत पेट्रोल १४२ रुपयांवरून १३९.५८ रुपये प्रति लिटर झाले असून, म्यानमारमध्ये दर १४०.२० रुपयांवरून थेट ११८.३७ रुपयांपर्यंत घसरले आहेत. भूतानमध्ये पेट्रोलचा दर सध्या १०९.७३ रुपये प्रति लिटर आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात तेल स्वस्त झाले असले तरी भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किरकोळ दरांमध्ये अद्याप कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तेल विपणन कंपन्यांनी सध्याचे दर कायम ठेवले आहेत. देशाची राजधानी दिल्लीमध्ये पेट्रोल १०२.१२ रुपये प्रति लिटर तर डिझेल ९५.२० रुपये प्रति लिटर दराने विकले जात आहे. जयपूरमध्ये पेट्रोलचा दर ११२.६६ रुपये आणि डिझेलचा दर ९७.७८ रुपये आहे. पाटण्यात पेट्रोल ११२.७० रुपये तर डिझेल ९९.८७ रुपये प्रति लिटर आहे. लखनौमध्ये पेट्रोल १०२.०५ रुपये आणि डिझेल ९९.२८ रुपये दराने उपलब्ध आहे. इंदूरमध्ये पेट्रोल ११४.६१ रुपये आणि डिझेल ९९.७० रुपये प्रति लिटर आहे, तर भोपाळमध्ये पेट्रोलचा दर ११४.६५ रुपये आणि डिझेलचा दर ९९.७४ रुपये प्रति लिटर आहे.या शांतता करारानुसार इराणला आपला संवर्धित युरेनियम साठा कमी करावा लागणार आहे. त्याबदल्यात अमेरिकेकडून आर्थिक आणि व्यापारविषयक काही निर्बंध हटवले जाणार आहेत. यामुळे इराणला जागतिक बाजारात पुन्हा मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची निर्यात करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

शिवसेना
Happy Birthday
मा. निखिल शेळके पा.
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
- शुभेच्छुक -
निखिल भाऊ शेळके मित्र परिवार
मालदाड रोड, तिरंगा चौक, साईश्रद्धा चौक, संगमनेर

अविवाहित, नवविवाहित, चाळीशीनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथुनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25